**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१६७/२०२३
दिनांक -३१.०१.२०२५

**प्रति,**

१. गुंडीलाल जंगू शेख
रा. दरीकोणुर ता.जत जि.सांगली ..... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. शाबीरा गुंडीलाल शेख
२. पवित्रा राजेंद्र पवार
३. निखील रमेश जगताप
४. सुनंदाबाई मारूती मिसाळ
५. द-याप्पा रामू पुजारी
६. तुकाराम रावजी पारसे
अ.क्र.१,४ ते ६ रा. दरीकोणुर ता.जत जि.सांगली
अ.क्र.२ व ३ रा. दरीबडची ता.जत जित.सांगली ..... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे दरीकोणूर, ता.जत, जि.सांगली येथील गट नंबर ३०७/१ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,माडग्याळ यांनी फेरफार नंबर २९८, दिनांक १३.०५.१९९२, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे दरीकोणूर, ता.जत, जि.सांगली येथील गट नंबर ३०७/१ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,माडग्याळ यांनी फेरफार नंबर २९८, दिनांक १३.०५.१९९२, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे. प्रस्तूतचे अपिल दाखल करणेस अपिलार्थी यांना जवळपास ३१ वर्षे इतका विलंब झालेला आहे. त्याकामी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केला आहे.

२. याकामी फेरफार नंबर २९८, दिनांक १३.०५.१९९२ पाहता दावा क्षेत्राचे अर्जावरून ८ आणेचा हिस्सा प्रत्यक्ष कब्जे वहिवाटी वरून अपिलार्थी यांनी जाबदार १ यांना हस्तांतरीत केलेचे दिसून

येते. तसेच वादातीत फेरफार नंतर फेरफार क्र.११११, २८५२ व ३७३४, या मिळकतीवर झालेच्या दिसून येतात. त्या नोंदीवर अपिलार्थी यांनी आक्षेप घेतलेचे दिसून येत नाही. आज रोजी ३१ वर्षानंर कोणत्याही संयुक्तिक कारणास्तव अपिलार्थी यांनी अपील अर्ज सादर केलेला आहे. वास्तविक त्यांची संमती नव्हती तर त्यांनी लगेच अपील अर्ज दाखल त्याचवेळी करणे आवश्यक होते. आज रोजी सदरचा मुद्दा दिवाणी स्वरूपाचा असून १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा जाबदार यांची वहिवाट असणार आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी सक्षम दिवाणी न्यायालयात दाद मागणे क्रमप्राप्त ठरणार आहे. यास्तव मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकार जत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज विलंब माफीचे मुद्दयावरच फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

उप विभागीय अधिकारी जत उपविभाग, जत

**( अजयकुमार नष्टे )**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -३१.०१.२०२५

प्रत - अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.